# स्मॉल फार्मर्स ग्रिबिझनेस कन्सोर्शियम' आयोजित महाराष्ट्र ग्रिबिझनेस कॉन्क्लेव्ह' परिषद यशस्वी




**पुणे । प्रतिनिधी**

स्मॉल फार्मर्स ग्रिबिझनेस कन्सोर्शियम'तर्फे (एसएफएसी) नुकतेच पुण्यात महाराष्ट्र ग्रिबिझनेस कॉन्क्लेव्ह' (एमएसी) या परिषदेचे आयोजन करण्यात आले. सध्याच्या शेतकरी उत्पादक संघटनांना बळ देणे आणि तंत्रज्ञान, वित्तपुरवठा व कच्च्या मालाच्या पुरवठ्याद्वारे या संघटनांची क्षमता व शाश्वतता वाढवण्यासाठी अभिनव व प्रभावी व्यूहरचना शोधणे, हा या परिषदेचा हेतू होता.

परिषदेत कृषी व कंपनी अशा दोन्ही क्षेत्रांतील नामवंत सहभागी झाले होते. त्यांनी आपल्या भाषणांत या विभागातील शेतकऱ्यांना असलेल्या समस्या मांडल्याच, परंतु शेतकरी उत्पादक संघटना/शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या शाश्वतीचा प्रसार करण्यासाठीचे दुवे, महाराष्ट्रात कृषीव्यवसायांचा प्रसार करण्यासाठी एसएफएसी'च्या व्हेंच्युअर कॅपिटल असिस्टन्स' व क्रेडिट गॅरंटी स्किम' यासारख्या योजनांच्या माध्यमातून कर्जांचे दुवे यासारख्या उपायांवरील आपल्या ज्ञानकौशल्याचीही देवाण-घेवाण केली.

शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या प्रसारासाठी व शाश्वततेसाठी सरकारचे वरिष्ठ अधिकारी, कंपन्या, बँकेचे अधिकारी, शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी, तसेच शिक्षण तज्ज्ञ अशा सर्व सहयोगींनी या परिषदेत भाग घेतला. २०० हून अधिक शेतकरी उत्पादक कंपन्या, १०० कंपन्या व बँकांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. शेतकरी उत्पादक कंपन्यांनी आपली उत्पादने सादर केली, तसेच कंपन्यांशी चर्चाही केली, ज्यातून कृषी मालाच्या बाजारपेठेशी जोडणीचा मार्ग तयार झाला.

परिषदेत एसएफएसी'चे व्यवस्थापकीय संचालक सुमंत चौधरी व बँक ऑफ बडोदा'चे ग्रामीण व कृषी बँकिंग आणि सीएसआर विभाग प्रमुख, तथा सरव्यवस्थापक बी. आर. पटेल यांनी शेतकरी उत्पादक संघटनांची सर्वांगीण वाढ व विकासासाठी एका सामंजस्य करारावर सह्या केल्या.